**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७४ दिनांक ३०/०९/२०२३**

# पालघर पोलीस दलाकडुन दि.०१ ऑक्टोबर रोजी "स्वच्छता अभियान" उपक्रम

भारताचे पंतप्रधान यांनी दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता देशातील सर्व नागरीकांस एकत्रितपणे १ तास श्रमदानाचे आवाहन केले आहे. त्याअनुषंगाने मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.पोमसं/३६/र.व का. ८३००/८४/२०२० दि.२५/०९/२०२३ रोजी अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटकात दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता एकत्रितपणे १ तास श्रमदान करावे बाबत परीपत्रक प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे हद्दिमध्ये पोलीस वसाहती, पोलीस ठाणे तसेच पोलीस मुख्यालय कार्यालये, उपविभागीय पोलीस कार्यालयांमध्ये स्थानिक महानगर पालिका, नगर परिषद, नगर पालिका यांच्या समन्वयाने दि.०१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

सदरचे अभियान राबविताना शहर व ग्रामिण भागातील स्थानिक नागरीक, लोकप्रतिनीधी, शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील, तटरक्षक दल, ग्रामरक्षक दल, मच्छिमार समिती, स्थानिक लोक प्राधिकरण कार्यालये, ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये विद्यार्थी इत्यादींचा समावेश असणार आहे. सदर अभियान लोकसहभागातून आपआपला परीसर स्वच्छ करून सदर अभियान यशस्वीपणे राबविण्याचा उद्देश आहे.

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे हद्दित स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून मा. पोलीस अधीक्षक हे स्वत: मौजे शिरगाव येथील शिरगाव चौपाटी व शिरगाव किल्ला याठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी असे उपस्थित राहुन सदर ठिकाणी स्वच्छता अभियान राबविणार आहेत.

तरी पालघर पोलीस दलाकडून जिल्ह्यातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सदर स्वच्छता अभियानामध्ये आपआपले विभागात आपण देखील मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व आपले योगदान द्यावे हि विनंती.